# दि तासगांव अर्बन को-ऑप बँक लि., तासगांव

प्रधान कार्यालय - गुरुवार पेठ, तासगांव, जि. सांगली

website : www.tasgaon.bank.in



२०२२-२३

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई यांचे मार्फत दिला जाणारा कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सह. बँक पुरस्काराने सन्मानित पुणे विभागातून एकमेव बँक आपली बँक



२०२३-२४

## ९१ वा
## वार्षिक अहवाल
## सन २०२५-२६

**ऑडिट वर्ग 'अ'**



# दि तासगांव अर्बन को-ऑप बँक लि., तासगांव

## ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २१/०८/२०२६

**स्थळ : कोहिनूर मल्टीपर्पज हॉल, विटा रोड, तासगांव, वेळ सकाळी ११.00 वा**

## सन २०२५-२६ सालचा ९१ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनीनो, सस्नेह नमस्कार ,

दि तासगाव अर्बन को-ऑप बँकेच्या आजच्या ९१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित सर्व सभासद बंधू भगिनी यांचे प्रथम मी स्वागत करतो आपल्या बँकेने विकासाचा टप्पा अतिशय उत्तम रीतीने गाठला आहे. बँकेची सर्वसाधारण सभा म्हणजे आपणा सर्वांना एकत्र व एकाचेवळी भेटण्याचा आनंद घेण्याची मोठी संधी

तालुक्यातील छोटे - मोठे व्यावसायिक, व्यापारी, कारागीर, शेतकरी शेतमजूर यांच्या आर्थिक गरजा भागविता याव्यात यासाठी आपल्या बँकेची स्थापना दि. ०६/०२/१९३६ रोजी कै. रावबहाद्दूर सदाशिव बाबाजी शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून केली. कै. रावबहाद्दूर सदाशिव बाबाजी शेटे, कै.शंकर जगन्नाथ कुत्ते वकील आणि कै.महादेवराव गोपीनाथ हिंगमिरे तसेच त्या त्या काळातील अध्यक्ष उपाध्यक्ष संचालक मंडळ यांच्या कार्यकाळात बँकेची प्रगती झाली. दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने सर्वच स्तरावर चांगली कामगिरी पार पाडली आहे.

### सन २०२४- २०२५ ते सन २०२५-२०२६

| अ.क्र. | तपशील | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १) | सभासद संख्या | १००६९ | १०३११ | २४२ |
| २) | शेअर भांडवल | ४,८९,०३,७६०=०० | ५,८१,४६,५५०=०० | ९२,४२,७९०=०० |
| ३) | फंडस् | ३१,४५,१३,२८१=०० | ३८,३०,२९,२३२=०० | ६,८५,१५,९५१=०० |
| ४) | ठेवी | २५८,७३,७७,४७९=०० | ३०५,०८,८१,५२६=०० | ४६,३५,०४,०४७=०० |
| ५) | कर्जे | १५२,७५,११,७०१=०० | १८१,७३,६०,३३१=०० | २८,९८,४८,६३०=०० |
| ६) | खेळते भांडवल | ३१३,२२,७४,०६७=०० | ३६२,५०,८२,९०८=०० | ४९,२८,०८,८४१=०० |
| ७) | निव्वळ नफा | ३,२४,७९,२१८=०० | ३,६३,२९,००९=०० | ३८,४९,७९१=०० |
| ८) | डिव्हीडंड | १२% | १३% | -१ |
| ९) | ऑडीट वर्ग | अ | अ | अ |

अहवाल सालात वरीलप्रमाणे बँकेने भरीव अशी कामगिरी केलेली आहे त्यासाठी मी माझे सहकारी संचालक व कर्मचारी यांना मनापासून धन्यवाद देतो व सदर अहवाल आपणापुढे मंजुरीसाठी ठेवत आहे त्यास आपण मंजुरी द्यावी अशी सर्वांना विनती आहे.

**सभा -** अहवाल सालामध्ये दि. २०/०८/२०२५ रोजी आपल्या बँकेची ९० वी वार्षिक सर्व साधारण सभा होऊन त्यामध्ये सन २०२४-२०२५ सालचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रके वाचन इ. कामकाज नियमाप्रमाणे करणेत आले. तसेच अहवाल सालामध्ये संचालक मंडळाच्या १६ सभा घेणेत येऊन त्यामध्ये बँकेच्या दैनंदिन कामकाजासबंधीचे निर्णय घेणेत आले.

**सभासद -** अहवाल सालात बँकेच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१) अ वर्ग सभासद -१०३११     २) ब वर्ग सभासद - ३६१

**भाग भांडवल व निधी -** चालू अहवाल सालामध्ये बँकेच्या भाग भांडवलात व निधीमध्ये उल्लेखनीय वाढ झालेली आहे. हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरून आपले लक्षात येईल.

| अ.नं. | तपशील | सन २०२४-२०२५ | सन २०२५-२०२६ | झालेली वाढ | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १) | भाग भांडवल | ४,८९,०३,७६०=०० | ५,८१,४६,५५०=०० | ९२,४२,७९०=०० | १८.९०% |
| २) | राखीव व इतर निधी | ३१,४५,१३,२८१=०० | ३८,३०,२९,२३२=०० | ६,८५,१५,९५१=०० | २१.७८% |

**सी.आर.ए.आर. -**रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आर.चे प्रमाण १२% असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचे सदरचे प्रमाण १८.१९ % इतके आहे यावरून बँकेची सक्षमता दिसून येते.

**ठेवी -**आपल्या बँकेच्या दि. ३१/०३/२०२६ अखेर सर्व प्रकारच्या ठेवी रुपये ३०५.०९ कोटी आहेत.

**ठेव विमा योजना -** ठेवीदारांचे रू. ५.०० लाख इतक्या ठेव रक्कमेस डिपॉझिट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन लि. मुंबई यांचे विमा संरक्षण आहे. बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा हप्त्याची रक्कम खालीलप्रमाणे भरली आहे.

| अ.नं. | भरणा केलेला दिनांक | आर. टी. जी. एस.क्रमांक | विमा हप्त्याची रक्कम |
|---|---|---|---|
| १) | १५/०५/२०२५ | आयसीआयसीआयबँक युटीआर आय-आयसीआयसीआर - २२०२५०५१५०९४२३२६६ | १६,३४,७५२=१८ |
| २) | २७/११/२०२५ | आयसीआयसीआयबँक युटीआर आय-आयसीआयसीआर - २२०२५११२७१२९३९५९३ | १७,०४,९७३=०६ |
| | | एकूण | ३३,३९,७२५=२४ |

**कर्जे –** बँकेने दिनांक – ३१/०३/२०२६ अखेर सभासदांना कर्जपुरवठा केला असून त्याची येणे रक्कम रु.१८१.७४ कोटी इतकी आहे.

**अग्रक्रम व दुर्बल घटक कर्जपुरवठा–** बँकेने केलेले कर्जवाटप हे रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार केले असून दि. ३१/०३/२०२६ अखेर अग्रक्रम क्षेत्रासाठी ८३.६२ % व दुर्बल घटक क्षेत्रासाठी १५.५९ % इतका कर्जपुरवठा केलेला आहे.

**गुंतवणूक –** दिनांक – ३१/०३/२०२६ अखेर बँकेने रक्कम रु.१५०.१८ कोटी इतकी गुंतवणूक केली आहे. या शिल्लक निधीची कौशल्याने कायदेशीर व रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे गुंतवणूक करून त्यातून अधिकाधिक उत्पन्न मिळविणेचा प्रयत्न केलेला आहे.

**थकबाकी –** अहवाल सालाच्या सुरुवातीस थकबाकी रुपये ३४७=०८ लाख इतकी होती. त्याचे शेकडा प्रमाण २.४१% इतके होते. अहवाल सालअखेर थकबाकी रु.६६३=५७ लाख इतकी असून या थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण ३.४९% इतके आहे.

(रक्कम लाखात)

| अ.नं. | तपशील | कर्ज प्रकरणे | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बँकेने विशेष वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीसाठी दिलेली १०१ खालील कर्ज प्रकरणे | ४७ | ३९३=९५ |
| २) | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे १०१ खालील दाखल केलेली प्रकरणे | ० | =० |
| ३) | बँकेने विशेष वसुली अधिकारी यांचेकडे वसुलीसाठी दिलेली ९१ खालील कर्ज प्रकरणे | ४ | ००५=०० |
| ४) | बँकेने कोर्टामध्ये लवाद दावे ९१ खालील दाखल केलेली प्रकरणे | ३ | १६=०३ |
| ५) | बँकेने कायदेशीर कारवाई न केलेली प्रकरणे | १४४ | २१८=५९ |
| | **एकूण** | **१९८** | **६३३=५७** |

**उत्पन्नक्षम नसलेली कर्जे – (एन.पी.ए.)** दि. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेचे एकुण येणे कर्ज रु. १८१.७४ कोटी पैकी एकुण ढोबळ एन.पी.ए. कर्ज रक्कम रु. ७.४५ कोटी इतकी आहे. येणे कर्जाशी ढोबळ एन.पी.ए.चे शेकडा प्रमाण ४.१०% इतके असून निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ०% इतके आहे. बँकेची एन.पी.ए. कर्जाची वसुली चांगली झालेली आहे.

**लेखापरीक्षण व हिशोब तपासणी –** सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण मा. किशोर आर जोशी अँड असोसीएट्स चार्टर्ड अकैाटंट सांगली यांनी पूर्ण केले असून दि. ३१/०३/२०२६ अखेरच्या बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करून ऑडीट वर्ग 'अ' दिला आहे. बँकेच्या कामकाजासंदर्भात त्यांनी केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच मा. सचिन एस. आबदार अँड कंपनी, चार्टर्ड अकौटंट विटा यांनी अंतर्गत लेखापरीक्षण पूर्ण केले असून दि. ३१/०३/२०२६ अखेरच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी अंतर्गत लेखा परीक्षणा दरम्यान केलेल्या सूचना व मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत.

**नफा विभागणी –** अहवाल सालात बँकेस रुपये ३,६३,२९,००९.३४ इतका नफा झाला असून सन २०२४–२०२५ सालचा शिल्लक नफा रु. १६६=६२ इतका असून एकूण शिल्लक रु. ३,६३,२९,१७५=९६ नफा विभागणीस पात्र आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळास शिफारस आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १) | मागील शिल्लक नफा | १६६=६२ | रिझर्व्हफंड–२५% प्रमाणे | ९१,२१,०००=०० |
| २) | चालू सालचा नफा | ३,६३,२९,००९=३४ | जनरल रिझर्व्ह फंड १०% प्रमाणे | ३६,३२,९१८=०० |
| ३) | | | डिव्हिडंड १२% प्रमाणे | ६२,११,८५२=०० |
| ४) | | | सोशल फंड १% प्रमाणे | ३,६३,२९२=०० |
| ५) | | | गुंतवणूक चढ–उतार निधी | ६०,००,०००=०० |
| ६) | | | इमारत निधी | १,१०,००,०००=०० |
| ७) | | | शिल्लक नफा | ११३=९६ |
| | **एकूण** | **३,६३,२९,१७५=९६** | **एकूण** | **३,६३,२९,१७५=९६** |

तरी वरीलप्रमाणे सुचविलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणेत यावी अशी विनंती आहे.

**सामाजिक बांधिलकी –** आपल्या बँकेने दिनांक – १०/०८/२०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेत मंजूर केलेप्रमाणे दिनांक – १५/०८/२०११ रोजीपासून सभासद अथवा सभासदाचे मुलास / मुलीस कन्यारत्न झालेस या योजनेचा लाभ सभासदांना दिला जातो. यासाठी संदर सभासदाने स्वतःस अथवा मुलास / मुलीस कन्यारत्न झालेपासून एक वर्षाचे आत त्याचा लाभ घेणेसाठी बँकेकडे नाव नोंदणी किंवा मागणी केली पाहिजे. त्यानंतर बँकेतर्फे रु. ५०००/– इतकी ठेव अशा मुलीच्या नावे ठेवणेत येते. मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झालेनंतर त्या मुलीस ठेव पावतीची रु. २०,८०६/– इतकी रक्कम देणेत येते. एकुण रु. २६,२५,६५५/– इतक्या रक्कमेचा या योजनेद्वारे लाभ देणेत आला आहे.

**जेष्ठ नागरिक व विधवा महिलांना जादा व्याजदर –** बँकेने एक सामाजिक जबाबदारी म्हणून जेष्ठ नागरिकांना व विधवा महिलांना त्यांच्या मुदत ठेवीवर ०.५०% जादा व्याजदर देणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

**सोलर एनर्जी प्रकल्प :** बँकेने प्रधान कार्यालयामध्ये वीज बचत होण्यासाठी १९.५० केव्हीए चा सोलर एनर्जी प्रकल्प बसविला आहे.

**आभार –** बँकेच्या प्रगतीमध्ये माझे सहकारी संचालक, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, असि.जन.मॅनेजर, शाखाधिकारी व कर्मचारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांनी जे आपुलकीने सहकार्य दिले त्याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. तसेच मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सांगली, मा. विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था सांगली, मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तासगाव, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक्स फेडरेशन लि मुंबई, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक्स असोसिएशन लि मुंबई, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप, बँक लि.मुंबई, स्टेट बँक ऑफ इंडिया, सांगली जिल्हा मध्य.सहकारी बँक लि.सांगली, युनियन बँक ऑफ इंडिया, ॲक्सीस बँक लि, बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय बँक,आय सी.आय.सी.आय बँक, सांगली जिल्हा नागरी सहकारी

## दि. ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०२५ | भांडवल व देणी | दि. ३१/०३/२०२६ |
|---|---|---|
| ४८९०३७६०=०० | वसूल भाग भांडवल | ५८१४६५५०=०० |
| ३४६९९२४९९=७६ | राखीव निधी व इतर निधी | ३८३०२९२३२=४० |
| २५८७३७७४७९=०५ | ठेवी | ३०५०८८१५२६=८१ |
| ०=०० | घेतलेली कर्जे | ०=०० |
| १६२२२९८९६=७२ | इतर देणी आणि तरतुदी | १५००९७३४१=८५ |
| **३१४५५०३६३५.५३** | **एकूण** | **३६४२१५४६५१=०६** |

## ३१ मार्च २०२६ अखेरचे नफा तोटा पत्रक

| दि. ३१/०३/२०२५ | खर्चाचा तपशील | दि. ३१/०३/२०२६ |
|---|---|---|
| १९८२३४८८६.७९ | दिलेले व्याज | १९५६१२३८०=८८ |
| ३९१२५८४२.६७ | प्रशासकीय खर्च | ३४९९९८९३=१६ |
| २३१५४४०१.३८ | इतर प्रशासकीय खर्च | २१७१४१९३=९६ |
| ३८०००००.०० | अनुत्पादक मालमत्तेसाठी तरतूद | ४७०००००=०० |
| ११३८२७००.०० | आयकर | १२२१००००=०० |
| २०६३०२.०० | डेफर्ड टॅक्स | ०=०० |
| ३२४७९११७.४७ | निव्वळ नफा | ३६३२९००९=३४ |
| **३०८३८३२५०.३१** | **एकूण** | **३०५५६५४७७.३४** |

बँक्स असोसिएशन लि सांगली इ. यांचे वेळोवेळी बँकेला सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या सर्वांचा मी आभारी आहे. तसेच मा. संजयकाका पाटील माजी खासदार व माजी उपाध्यक्ष कृष्णा खोरे विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य, मा.श्री.रोहित (दादा) पाटील आमदार तासगाव कवठे महांकाळ विधानसभा मतदार संघ, मा.श्री अविनाश (काका)पाटील उपाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर. मा. श्रीमती सुमनताई आर.आर. पाटील, माजी आमदार तासगाव कवठे महांकाळ विधानसभा मतदार संघ यांनी बँकेच्या प्रगतीसाठी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल मी त्यांचे मनपूर्वक आभार मानतो. पुन्हा एकवेळ आपण सर्वांनी बँकेच्या प्रगतीसाठी दिलेल्या सहकार्याबद्दल मनपूर्वक आभार मानून मा. संचालक मंडळाच्यावतीने सादर केलेला ९१ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, आणि हिशोब पत्रकास मंजुरी द्यावी अशी विनंती करून हा अहवाल सादर करतो.

आपला नम्र,

**जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !!**

**मा. कुमार रामचंद्र शेटे**
अध्यक्ष

## दि. ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| दि. ३१/०३/२०२५ | मालमत्ता व येणी | दि. ३१/०३/२०२६ |
|---|---|---|
| ३०५४५८४८=०० | रिझर्व बँकेकडील व हातातील रोख रक्कम | ४५००३२९९=०० |
| ४७२३५८५४३=६४ | बँकांमधील शिल्लक | ५१५२३९७७५=२१ |
| १०३७३८०२७३=४० | गुंतवणूक | ११७२७११८३१=६७ |
| १५२७५११७०१=०९ | कर्जे | १८१७३६०३३१=६१ |
| २२११९२३२=०८ | मालमत्ता, संयंत्र आणि उपकरणे | २००२३४४६=४८ |
| ५५५८८०३७=३२ | इतर मालमत्ता | ७१८१५९६७=०९ |
| **३१४५५०३६३५=५३** | **एकूण** | **३६४२१५४६५१=०६** |
| १२०६२१६६=७९ | बँक गॅरंटी | १०१६७०११=१२ |

## ३१ मार्च २०२६ अखेरचे नफा तोटा पत्रक

| दि. ३१/०३/२०२५ | उत्पनाचा तपशील | दि. ३१/०३/२०२६ |
|---|---|---|
| ३०४८००५३७=५६ | मिळालेले व्याज आणि सूट | ३००५६०८२९=३९ |
| ३५८२७१२=७५ | इतर उत्पन्न | ५००४६४७=९५ |
| **३०८३८३२५०=३१** | **एकूण** | **३०५५६५४७७=३४** |

# सन २०२६–२७ सालाकरीता अंदाजे बजेट

| अ.नं. | तपशील (उत्पन्न) | २०२५–२०२६ मागील अंदाज | २०२५–२०२६ प्रत्यक्ष उत्पन्न | २०२६–२०२७ पुढील अदाज |
|---|---|---|---|---|
| १) | व्याज व डिस्काऊंट (सरप्लस) | ३६००००००=०० | ३००५६०८२९=३९ | ३४७००००००=०० |
| २) | कमिशन,एक्सचेंज व ब्रोकरेज | ५०००००=०० | ४७८५१६=६४ | ६०००००=०० |
| ३) | इतर जमा | ४०००००=०० | ४५२६१३१=३१ | ५०००००=०० |
| | एकूण | ३६९०००००=०० | ३०५५६५४७७=३४ | ३५२६०००००=०० |

| अ.नं. | तपशील (खर्च) | २०२५–२०२६ मागील अंदाज | २०२५–२०२६ प्रत्यक्ष खर्च | २०२६–२०२७ पुढील अदाज |
|---|---|---|---|---|
| १ | ठेवींवर दिलेले व्याज | २०००००००.०० | १९५६१२३८०.८८ | २१५००००००.०० |
| २ | पगार,अल्लौन्सेस,प्रा.फंड,प्रशिक्षण व स्टाफ ड्रेस | ४००००००.०० | ३३१२९५३०.१६ | ४००००००.०० |
| ३ | संचालक मंडळ भत्ते | ७७५०००.०० | ८३१०००.०० | ८४००००.०० |
| ४ | ऑडीट फी | ६०००००.०० | १०३९३६३.०० | ११०००००.०० |
| ५ | भाडेकर, दिवाबत्ती, विमाखर्च, व्यवसायकर | ८००००००.०० | ७२०११८३.१८ | ७२५००००.०० |
| ६ | टपाल, तार व पोस्टेज | ८५००००.०० | ५७२७६६.१८ | ७०००००.०० |
| ७ | स्टेशनरी, छपाई व जाहिरात | ६०००००.०० | ४९३३४४.२३ | ५०००००.०० |
| ८ | मालमत्तेची दुरुस्ती व घसारा | ५३०००००.०० | ३४७९२३१.३२ | १४००००००.०० |
| ९ | अल्पबचत कमिशन | २००००००.०० | १६४५९११.१० | १६५००००.०० |
| १० | जनरल मिटिंग खर्च | २५००००.०० | १६१४००.१० | २०००००.०० |
| ११ | वर्तमान पत्र खर्च | १००००.०० | १०१९४.०० | १००००.०० |
| १२ | बँक असोशीयशन वर्गणी | ७००००.०० | ७२०००.०० | ७००००.०० |
| १३ | ॲड्व्हायझरी व सर्विस चार्जेस | ३०००००.०० | ५१४६२५.२२ | ५२००००.०० |
| १४ | हॉटेल खर्च | ६०००००.०० | ५८८४५४.८६ | ६०००००.०० |
| १५ | अल्पबचत बक्षीस योजना | ५०००.०० | २२५०.०० | ३०००.०० |
| १६ | प्रवास खर्च | २०००००.०० | १५१७९८.६४ | १६००००.०० |
| १७ | समारंभ खर्च | १०००००.०० | ५६६७१.०० | ६००००.०० |
| १८ | देणगी व वर्गणी | ५००००.०० | ८६०००.०० | ५००००.०० |
| १९ | वार्षिक अहवाल छपाई | ५००००.०० | ०.०० | ०.०० |
| २० | झेरॉक्स खर्च | २००००.०० | १९८७५.०० | २००००.०० |
| २१ | कर्ज वसुली खर्च | ५०००.०० | ०.०० | ०.०० |
| २२ | लाईट फिटिंग खर्च | ५००००.०० | १८५५.०० | २०००.०० |
| २३ | सभासद प्रशिक्षण खर्च | १००००.०० | ५०००.०० | ८०००.०० |
| २४ | रिबेट | १४०००००.०० | ३११४०६८.०० | ३३०००००.०० |
| २५ | इंधन खर्च | ४०००००.०० | २४९८९२.४४ | ३०००००.०० |
| २६ | किरकोळ खर्च | २५००००.०० | २०५२५१.७८ | २५००००.०० |
| २७ | संगणक व इतर एएमसी खर्च | ४०००००.०० | ४४४२००.०० | ५००००००.०० |
| २८ | ए.टी.एम. चार्जेस | १६००००.०० | २८००००.०० | ३०००००.०० |
| २९ | इश्यूअर एन.पी.सी.आय. स्विचिंग फी | २०००.०० | १६७३.०२ | २०००.०० |
| ३० | जी.एस.टी. | ३५०००००.०० | १३६४३५७.१६ | १४०००००.०० |
| ३१ | लीगल चार्जेस | ३०००००.०० | २६७१९१.७३ | २८००००.०० |
| ३२ | इतर तरतूदी | १५००००००.०० | १६९१००००.०० | १८००००००.०० |
| ३३ | व्हाट्सएप चॅटबॉट खर्च | ४३०००.०० | ०.०० | ०.०० |
| ३४ | निवडणूक खर्च तरतूद | ०.०० | ७२५०००.०० | १०२५०००.०० |
| ३५ | एकुण खर्च | ३२९००००००.०० | २६९२३६४६८.०० | ३१२६०००००.०० |
| ३६ | दि.३१/०३/२०२६ चा निव्वळ नफा | ०.०० | ३६३२९००९.३४ | |
| ३७ | दि.३१/०३/२०२७ चा संभाव्य नफा | ४००००००.०० | | ४००००००.०० |
| | एकूण | ३६९००००००.०० | ३०५५६५४७७.३४ | ३५२६०००००.०० |

**शाखा विस्तार** ▶ मुख्य कार्यालय (०२३४६) – २४१२९०,२४१२९१

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शाखा तासगांव | शाखा सावळज | शाखा मणेराजुरी | शाखा सांगली | शाखा कुपवाड | शाखा क. महांकाळ |
| ८९५६११६४६६ | ८९५६११६४६८ | ८९५६११६४७० | ८९५६११६४७३ | ८९५६११६४७४ | ८९५६११६४६७ |
| शाखा पलूस | शाखा जत | शाखा माधवनगर | शाखा विटा | शाखा पंढरपूर | शाखा सोलापूर |
| ८९५६११६४७८ | ८९५६११६४८१ | ८९५६११६४७७ | ८९५६११६४८६ | ८९५६११६४८४ | ८९५६११६४७६ |

बँकेचे संस्थापक



कै. रावबहाद्दूर सदाशिवराव बाबाजी शेटे

बँकेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा



कै. शंकर जगन्नाथ कुत्ते वकील
माजी चेअरमन

बँकेचे कुटुंब प्रमुख व मा. चेअरमन



कै. महादेवराव गोपिनाथ हिंगमिरे

## संचालक मंडळ



श्री. कुमार रा. शेटे
चेअरमन



श्री. अनिल गुं. कुत्ते
व्हा. चेअरमन



श्री. महेश्वर म. हिंगमिरे
संचालक



श्री. सदाशिव बा. शेटे
संचालक



श्री. अरुण प. पाटील
संचालक



श्री. विनय मु. शेटे
संचालक



श्री. उदय तु. वाटकर
संचालक



श्री. धोंडीराम खा. सावंत
संचालक



श्री. रामशेठ आ. शेटे
संचालक



श्री. राजेंद्र ना. माळी
संचालक



श्री. सौरभ रा. हिंगमिरे
संचालक



श्री. उदय गो. डफळापूरकर (सी.ए.)
तज्ञ स्वीकृत संचालक



ॲड. श्री. आशिष अ. अडगळे
तज्ञ स्वीकृत संचालक



श्रीमती सविता स. पैलवान
महिला संचालिका



सौ. उमा कै. हिंगमिरे
महिला संचालिका



श्रीकांत स. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी
(१८जून २०२६ पर्यंत)

## व्यवस्थापन मंडळ सदस्य



श्री. रविंद्र विश्वनाथ देवधर



श्री. अवधूत जगन्नाथ गडकर



श्री. प्रदीप आप्पासो पवार

# दि तासगांव अर्बन को-ऑप. बँक लि., तासगांव

**गुरुवार पेठ, तासगांव, ता. तासगांव, जि. सांगली**

## ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

सन्माननीय, सर्व सभासदांना कळविणेत येते की , दि तासगांव अर्बन को - ऑप. बँक लि,. तासगांव या बँकेची ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक- २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कोहिनूर मल्टी पर्पज हॉल विटा रोड, तासगाव येथे मा.चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेकरीता सभेच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे अशी नम्र विनंती आहे.

### ❊ सभेपुढील विषय ❊

१) दि. २०/०८/२०२५ रोजी झालेल्या ९० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
३) दि. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके वाचून मंजूर करणे.
४) संचालक मंडळाने सन २०२५-२०२६ या वर्षातील नफ्याची विभागणी सुचविली आहे त्यास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२०२६ मध्ये अंदापत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२०२७ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे मा. संचालक मंडळाने सुचविलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.
६) सन २०२५-२०२६ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या मा.किशोर आर जोशी अँड असोसीएट्स चार्टर्ड अकौंटंट सांगली यांच्या तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे व स्वीकारणे..
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या झालेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास अनुसरुन बँकेने सहकार खात्याकडे सादर करणेत आलेल्या दोष दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
८) आर्थिक वर्ष २०२७ - २०२८ सालाकरिता अंतर्गत लेखापरीक्षकाची निवड करणे व त्यांचे मानधन ठरवणे.
९) सन २०२६-२०२७ करीता वैधानिक लेखापरिक्षणासाठी बँकेच्या संचालक मंडळाने रिझर्व बँकेला शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांची नोंद घेणे.
१०) अहवाल सालात महाराष्ट्र शासनाच्या सामोपचार व एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेनुसार ज्या कर्जदारांना सवलत दिली आहे त्याची नोंद घेणे.
११) सन २०२६-२७ मध्ये बँकेच्या संगणक प्रणालीचे नुतनीकरण तसेच शाखा तासगाव,जत, कवठेमहांकाळ व कुपवाड येथे फर्निचर फिटिंगसाठी भांडवली गुंतवणूकीची नोंद घेऊन त्यास मान्यता देणे.
१२) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेच्या स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.
१३) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
१४) मा. अध्यक्षसो, यांचे अनुमतीने आलेल्या आयत्या वेळच्या विषयावर विचार विनिमय करणे.

**मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार**

स्थळ : **तासगांव**
दिनांक : ०६-०८-२०२६

**श्री. नारायण शिवलिंग सगरे**
प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. कुमार रामचंद्र शेटे**
अध्यक्ष

---

**विशेष सूचना-**

१) सदर सभा गणपूर्तीअभावी तहकूब झालेस ही सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी घेणेत येईल. अशा सभेस आवश्यक गणपूर्तीचे बंधन असणार नाही. २)सभासदांनी बँकेच्या नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधून ई - मेल , व्हॅाटस्ॲप सुविधा असलेल्या मोबाईल क्रमांकाची नोंद करावी.३)बँकेच्या सभासदांना सभेपुढील विषयाबाबत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते प्रश्न सोमवार दि.१७/०८/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी सादर करावेत.४)यापूर्वी बँकेतर्फे सत्कार झालेला आहे असे सभासद सोडून ज्या सभासदांचे वय ७१ वर्षे पूर्ण झालेले आहे अशा सभासदांनी आपली नावे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी तीन दिवस अगोदर प्रधान कार्यालयात देऊन सहकार्य करावे. सोबत वयाचा पुरावा म्हणून जन्मतारखेचा दाखला आणावा५)सभासदांनी मागणी केल्यास अहवालाची प्रत नजीकच्या शाखेत मिळेल.**६)वार्षिक सर्वसाधारण सभेची कार्यवाही पूर्ण झालेनंतर कार्यालयामध्ये स्नेहभोजनाची व्यवस्था केलेली आहे.**

**प्रेषक :**
**श्री. कुमार रामचंद्र शेटे, अध्यक्ष**
दि तासगांव अर्बन को-ऑप. बँक लि., तासगांव
२३९६,बी,गुरुवार पेठ, तासगांव, जि. सांगली.

मुद्रक : माधव आर्ट प्रिंटर्स, तासगांव/९८५०७७४००९

प्रति,
श्री./सौ. ____________________

____________________

मु. पो. ____________________
ता. ____________ जिल्हा ____________